पद्माकर पारखे, निकम, राजू खेडकर, डॉ. नितीन भोसले, महेश देशमुख, अमोल जगताप, अरुण बर्डे आदी उपस्थित होते. ससून सर्वोपचार रुग्णालय रक्तपेढीने रक्त संकलन केले.

## साबळे महाविद्यालयात ऑनलाइन कार्यक्रम

गराडे : सासवड येथील पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या शेठ गोविंद रघुनाथ साबळे पदवी व पदविका औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयात संविधान दिन ऑनलाइन पद्धतीने साजरा करण्यात आला. या वेळी संविधान दिनाबाबत महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. राजश्री चव्हाण यांनी माहिती दिली. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना संविधान म्हणजे काय, त्यात येणारे घटक याबाबतची सविस्तर माहिती ॲड. संतोषी निगडे यांनी दिली. या कार्यक्रमात प्रा. विशाखा गायकवाड यांनी सर्वांना संविधानाची शपथ दिली. कार्यक्रमाचे आयोजन प्रा. जयश्री जगताप, प्रा. श्वेता फडतरे यांनी केले.

## गुरोळीत विद्यार्थ्यांनी घेतली शपथ